# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता. ०१/०४/२०२०** **पोलीस स्टेशन - वाकड**

**मनाई आदेशाचे उल्लंघन करुन शहरात विनाकारण फिरणाऱ्या एकुण ५० वाहनचालकांविरुध्द वाकड पोलीसांनी केली कारवाई.**

आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या रोगाचे कोविड-१९ या विषाणुचे संसर्ग बाधीत रुग्ण आढळत आहेत. या विषाणुचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणेकरीता उपाय योजना म्हणुन शासनाने व मा. पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडील १) जावक क्रं. २६३८/२०२० व २) जावक क्रं. २६३९/२०२० दि. ३१/०३/२०२० रोजीचे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१) (३) प्रमाणेचे प्रतिबधात्मक आदेशान्वये सार्वजनिक रोडवर अत्यावश्यक सेवेअंतर्गत होणारी वाहतुक तसेच नाशवंत पदार्थाची वाहतुक खेरीज करुन सार्वजनिक वाहतुक तसेच खाजगी वाहनांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात प्रवेश करण्यास मनाई राहील तसेच कोणत्याही व्यक्तीला सार्वजनिक रस्त्यावर गल्लोगल्ली, सायकल तसेच पारंपारिक व अपारंपारिक इंधनावर चालणाऱ्या मोटर सायकल,स्कुटर,( गियर सह/शिवाय) सर्व प्रकारची वाहतुक करणारी तीनचाकी वाहने, हलकी वाहने, जड अवजड वाहने, वाहतुकीचे वाहने, यांची वाहतुक व त्यामधुन प्रवास करण्यास मनाई करणारा आदेश यापुर्वी केला होता सदर आदेशास उपरोक्त केंद्रशासनाच्या आदेशान्वये मुदतवाढ देवुन दि. १४/०४/२०२० रोजी २४.०० वा. पर्यंत आदेश लागु करण्यात आले आहेत सदरचा आदेश वाकड पोलीस स्टेशन हद्दीत सार्वजनीक ठिकाणी दिसेल अशा दर्शनी भागावर लावण्यात आला आहे. तसेच पोलीस स्टेशनकडील पोलीस वाहनावरील पी.ए. सिस्टम वरुन देखील जनतेस सदर आदेशाप्रमाणे नागरीकांना घराचे बाहेर पडु नये व आदेशाचे पालन करण्याबाबत आवाहन करण्यात आलेले असताना आज दिवसभरात वाकड पोलीस स्टेशन हद्दीत विनाकारण दुचाकीवर फिरणाऱ्या दुचाकीस्वारांना पकडुन त्यांचेकडे विचारपुस करता ते कोणत्याही विहीत कारणाशिवाय फिरत असल्याचे निदर्शनात आले अशा एकुण ५० वाहनचालकांविरुध्द सदर आदेशाचा भंग केल्याप्रकरणी वाकड पोलीस स्टेशन येथे भादंवि कलम १८८ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

अजुनही काहीजण सद्यपरिस्थितीचे गांभीर्य न ओळखता शहरामध्ये विनाकारण फिरत आहेत त्यामुळे नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की कोणीही अत्यावश्यक कारणाशिवाय घराचे बाहेर पडु नये व आदेशाचे पालन करुन शासनास सहकार्य करावे अन्यथा योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरची कारवाई मा. श्री. संदीप बिष्णोई सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विनायक ढाकणे सो, पोलीस उप आयुक्त, परि-२, पिंपरी चिंचवड, श्री. श्रीकांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, श्री. हरिष माने सहा. पोलीस निरीक्षक, श्री. सिद्धनाथ बाबर, पोलीस उप निरीक्षक व तपास पथकातील पोलीस कर्मचारी यांनी केली.

(विवेक मुगळीकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वाकड पो. स्टे. पिंपरी चि[illegible]


Mahindra
Duro

4412
3612
5020